# १

# राज्य अर्थव्यवस्था



# १. राज्य अर्थव्यवस्था

## राज्य उत्पन्न

१.१ सन २०२१-२२ च्या पूर्वानुमानानुसार राज्य अर्थव्यवस्थेत १२.१ टक्के वाढ तर देशाच्या अर्थव्यवस्थेत ८.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. सन २०२१-२२ च्या पूर्वानुमानानुसार दिसत असलेली वाढ ही सन २०२०-२१ मधील घटीच्या पार्श्वभूमीवर आहे. सन २०२१-२२ मध्ये ‘कृषि व संलग्न कार्ये’ क्षेत्रात ४.४ टक्के वाढ, ‘उद्योग’ क्षेत्रात ११.९ टक्के वाढ आणि ‘सेवा’ क्षेत्रात १३.५ टक्के वाढ अपेक्षित आहे. पूर्वानुमानानुसार सन २०२१-२२ मध्ये सांकेतिक (‘नॉमिनल’) (चालू किंमतीनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ ३१,९७,७८२ कोटी अपेक्षित आहे आणि वास्तविक (‘रिअल’) (सन २०११-१२ च्या स्थिर किंमतीनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ २१,१८,३०९ कोटी अपेक्षित आहे.

- सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक (१४.२ टक्के) आहे
- सन २०२१-२२ च्या पूर्वानुमानानुसार दरडोई राज्य उत्पन्न ₹ २,२५,०७३ अपेक्षित आहे

१.२ पहिल्या सुधारित अंदाजानुसार सन २०२०-२१ चे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २७,११,६८५ कोटी होते, तर सन २०१९-२० मध्ये ते ₹ २७,३४,५५२ कोटी होते. सन २०२०-२१ चे वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न ₹ १८,८९,३०७ कोटी होते, तर सन २०१९-२० मध्ये ते ₹ २०,४३,९८३ कोटी होते. सन २०२०-२१ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न ₹ १,९३,१२१ होते, तर सन २०१९-२० मध्ये ते ₹ १,९६,१०० होते.

दरडोई राज्य उत्पन्न आणि सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९+++ | २०१९-२०++ | २०२०-२१+ | २०२१-२२$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (₹ कोटी) | १२,८०,३६९ | १४,५९,६२९ | १६,४९,६४७ | १७,७९,१३८ | १९,६६,२२५ | २१,९८,१८५ | २३,५२,७८२ | २५,६७,८९७ | २७,३४,५५२ | २७,११,६८५ | ३१,९७,७८२ |
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ९९,५९७ | १,१२,०९२ | १,२५,२६१ | १,३२,८३६ | १,४६,८१५ | १,६३,७२६ | १,७२,६६३ | १,८६,०७४ | १,९६,१०० | १,९३,१२१ | २,२५,०७३ |

+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज $ पुर्वानुमान

सन २०२०-२१ करिता निवडक राज्यांचे दरडोई उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | हरियाणा | कर्नाटक | तेलंगणा | तामीळनाडू | महाराष्ट्र | आंध्र प्रदेश | मध्य प्रदेश | उत्तर प्रदेश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | २,३९,५३५ | २,३६,४५१ | २,३४,७५१ | २,२५,१०६ | १,९३,१२१ | १,७०,२१५ | १,०४,८९४ | ६५,३३८ |

संयुक्त राष्ट्रसंघाचा वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲन्ड प्रॉस्पेक्ट्स-२०२२ अहवालानुसार
सन २०२१ करिता जागतिक स्थूल उत्पादन व देशांतर्गत उत्पन्नातील वाढ

| तपशील | जागतिक | विकसित अर्थव्यवस्था | विकसनशील अर्थव्यवस्था | अल्प विकसित अर्थव्यवस्था | अमेरीकेची संयुक्त राज्ये | जपान | चीन | भारत | महाराष्ट्र$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थूल उत्पादनाचे वृद्धिदर (टक्के) | ५.५ | ४.८ | ६.४ | १.४ | ५.५ | २.२ | ७.८ | ९.० | १२.१^ |

$ सन २०२१-२२ करिता ^ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडील पुर्वानुमान

## किंमती

- राज्यात दि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी एकूण १,४८५ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत. योजनेच्या सुरुवातीपासून माहे जानेवारी, २०२२ पर्यंत, एकूण ८.२४ कोटी शिवभोजन थाळींचे वितरण करण्यात आले
- सन २०२१-२२ मध्ये प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्यासह प्रति व्यक्ती प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य विनामूल्य वितरित करण्यात येत आहे

१.३ कोविड-१९ निर्बंधांमुळे माहे एप्रिल, २०२१ करिता जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती संकलनात अडचणी आल्या आणि खाद्यपदार्थ गटाव्यतिरिक्त इतर गटातील वस्तुंच्या किंमती उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे, माहे एप्रिल, २०२१ करिता ‘कापड, बिछाना व पादत्राणे’, ‘संकीर्ण’ आणि ‘सर्वसाधारण’ या गटांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिगणित करता आले नाहीत. माहे मे, २०२१ ते माहे डिसेंबर, २०२१ या कालावधीत सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक ग्रामीण भागाकरिता ३२४.५ व नागरी भागाकरिता ३१२.१ होता.

१.४ माहे जून, २०२१ ते माहे डिसेंबर, २०२१ या कालावधीत सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ ग्रामीण भागाकरिता ३.२ टक्के व नागरी भागाकरिता ३.९ टक्के होती.

१.५ दि.३१ डिसेंबर, २०२१ रोजी राज्यात एकूण २५६.३४ लाख (६३.२१ लाख पिवळी, १७०.६२ लाख केशरी व २२.४२ लाख शुभ्र) शिधापत्रिकाधारक आहेत. सन २०२१-२२ मध्ये माहे डिसेंबरपर्यंत, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाअंतर्गत समाविष्ट एकूण पात्र १५३.३७ लाख पात्र शिधापत्रिकाधारकांपैकी ९९.६ टक्के शिधापत्रिकांची आधार जोडणी करण्यात आली आणि अवर्षणप्रवण १४ जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील एकूण ९.०९ लाख केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांपैकी ९९.३ टक्के शेतकऱ्यांच्या शिधापत्रिकांची आधार जोडणी करण्यात आली.

१.६ राज्यातील ५२,५५७ रास्त भाव दुकानांमध्ये अन्नधान्य वितरणाकरिता पॉईंट ऑफ सेल उपकरणे बसविण्यात आली. माहे डिसेंबर, २०२१ मध्ये सुमारे १.४३ कोटी कुटुंबांनी आधार बेस बायोमेट्रिक अधिप्रमाणनाद्वारे शिधावस्तूंचा लाभ घेतला.

१.७ राज्यात दि.२६ जानेवारी, २०२० पासून प्रति थाळी ₹ १० दराने गरीब व गरजुंना शिव भोजन पुरविण्यात येत आहे. कोविड-१९ महामारीच्या कालावधीत सुरुवातीला प्रति थाळी ₹ पाच दराने व तद्नंतर माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत शिव भोजन थाळी विनामूल्य पुरविण्यात आली.

१.८ ‘वन नेशन, वन रेशन कार्ड’ या योजनेअंतर्गत सन २०२१ मध्ये महाराष्ट्रातील १४,२४५ शिधापत्रिकाधारकांनी इतर राज्यांतून आणि इतर राज्यांतील ४९,९९६ शिधापत्रिकाधारकांनी महाराष्ट्रातून अन्नधान्याची उचल केली.

## लोकवित्त

- अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ नुसार राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.१ टक्के तसेच ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १९.२ टक्के आहे
- वार्षिक कार्यक्रम २०२१-२२
    - वार्षिक कार्यक्रम २०२१-२२ करिता एकूण ₹ १,३०,००० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला असून त्यापैकी जिल्हा योजनांचा हिस्सा ₹ १५,६२२ कोटी आहे

१.९ सन २०२१-२२ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्याची महसुली जमा ₹ ३,६८,९८७ कोटी, तर सन २०२०-२१ सुधारित अंदाजानुसार ₹ २,८९,४९८ कोटी आहे. अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ नुसार कर महसूल आणि करेतर महसूल (केंद्रीय अनुदानासह) अनुक्रमे ₹ २,८५,५३४ कोटी आणि ₹ ८३,४५३ कोटी आहे. माहे एप्रिल ते नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ १,८०,९५४ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ४९.० टक्के) आहे.

१.१० अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ नुसार राज्याचा महसुली खर्च ₹ ३,७९,२१३ कोटी असून सन २०२०-२१ च्या सुधारित अंदाजानुसार ₹ ३,३५,६७५ कोटी आहे.

१.११ अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२२ नुसार भांडवली जमेचा एकूण जमेतील आणि भांडवली खर्चाचा एकूण खर्चातील हिस्सा अनुक्रमे २३.८ टक्के व २१.७ टक्के आहे.

१.१२ सन २०२०-२१ च्या सुधारित अंदाजानुसार विकास खर्चाचा एकूण महसुली खर्चातील हिस्सा ६८.१ टक्के आहे.

➢ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार सहाय्यक अनुदाने -

- सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत एकूण ₹ ३,३७,२५२ कोटी रक्कमेची वित्तीय संसाधने राज्यास हस्तांतरित होणे अपेक्षित असून त्यापैकी ₹ ७०,३७५ कोटी सहाय्यक अनुदाने अपेक्षित आहेत
- राज्यास प्राप्त होणाऱ्या सहाय्यक अनुदानांपैकी ₹ ४१,३९१ कोटी अनुदान हे स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्राप्त होणे अपेक्षित असून त्यापैकी ₹ ७,०६७ कोटी अनुदान ग्रामीण तसेच नागरी भागातील आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणाकरिता राखीव आहे
- पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्याला केंद्र शासनाकडून सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत राज्य आपत्ती जोखिम व्यवस्थापन निधी अंतर्गत सुमारे ₹ १७,८०३ कोटी अनुदान प्राप्त होणे अपेक्षित आहे

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

➢ देशातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी व स्थूल कर्जे यामध्ये महाराष्ट्रातील बँकांचा हिस्सा दि.३१ मार्च, २०२१ रोजी अनुक्रमे १९.८ टक्के व २६.२ टक्के होता

➢ प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत दि.१९ जानेवारी, २०२२ पर्यंत, राज्यात एकूण ३.११ कोटी खाती उघडण्यात आली असून ग्रामीण/ निम-नागरी क्षेत्राचा हिस्सा ५६ टक्के होता

१.१३ दि. ३१ मार्च, २०२१ रोजी राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी ₹ ३०.५३ लाख कोटी व स्थूल कर्जे ₹ २८.९६ लाख कोटी होते. दि. ३१ मार्च, २०२१ रोजी कर्ज-ठेवी प्रमाण ९४.८ टक्के होते.

१.१४ सन २०२१-२२ करिता राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज आराखडा ₹ ४.६१ लाख कोटी असून त्यामध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राचा हिस्सा २५.८ टक्के आणि 'सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग आणि खादी व ग्रामोद्योग' क्षेत्राचा हिस्सा ५४.० टक्के आहे.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१५ राज्यात मान्सून २०२१ मध्ये सरासरी पावसाच्या ११८.२ टक्के पाऊस पडला. राज्यातील १८७ तालुक्यांमध्ये अतिरिक्त, १४६ तालुक्यांमध्ये सरासरी आणि २२ तालुक्यांमध्ये अपुरा पाऊस पडला.

१.१६ राज्याचे सरासरी वहिती क्षेत्र कृषि गणना १९७०-७१ नुसार ४.२८ हेक्टर होते तर कृषि गणना २०१५-१६ नुसार ते १.३४ हेक्टर आहे. कृषि गणना २०१५-१६ नुसार अल्प व अत्यल्प (२.० हेक्टर पर्यंत) वहिती खातेदारांच्या वहिती क्षेत्राचे प्रमाण एकूण वहिती क्षेत्राच्या ४५ टक्के होते, तर अल्प व अत्यल्प वहिती खातेदारांची संख्या एकूण वहिती खातेदारांच्या ७९.५ टक्के होती.

१.१७ सन २०२१-२२ च्या खरीप हंगामामध्ये १५५.१५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया, कापूस व ऊस यांच्या उत्पादनात अनुक्रमे ११ टक्के, २७ टक्के, १३ टक्के, ३० टक्के व ०.४ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१८ सन २०२१-२२ च्या रब्बी हंगामामध्ये माहे जानेवारी अखेर ५२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत कडधान्याच्या उत्पादनात १४ टक्के वाढ अपेक्षित असून तृणधान्ये व तेलबियांच्या उत्पादनात अनुक्रमे २१ टक्के व ७ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१९ सन २०२०-२१ मध्ये फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र २१.०९ लाख हेक्टर असून २९१.४३ लाख मे. टन उत्पादन अपेक्षित आहे.

राज्यातील पाऊस व पीक उत्पादन

| तपशील | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पावसाची सरासरीच्या तुलनेत टक्केवारी | १०२.३ | ९०.३ | १२४.६ | ७०.२ | ५९.४ | ९४.९ | ८४.३ | ७३.६ | ११२.६ | ११३.४ |
| पीक | | | | | उत्पादन ('००० मे.टन)$ | | | | | |
| तृणधान्ये | १०,२७६ | ८,६६७ | १०,६७७ | ९,२५९ | ७,२१० | १२,६४६ | १०,९४४ | ७,९४७ | ९,२१८ | १२,२०१ |
| कडधान्य | २,२२५ | २,२६२ | ३,११४ | २,०१९ | १,५४५ | ४,५८४ | ३,६८४ | २,६८३ | ३,८४९ | ४,४४४ |
| एकूण अन्नधान्ये | १२,५०१ | १०,९२९ | १३,७९१ | ११,२७८ | ८,७५५ | १७,२३० | १४,६२८ | १०,६३० | १३,०६७ | १६,६४६ |
| तेलबिया | ४,४८५ | ५,०८७ | ५,२९४ | २,८५० | २,४३६ | ५,११३ | ४,२०८ | ४,८८५ | ५,१७८ | ६,७१९ |
| ऊस | ८६,७३३ | ६९,६४८ | ७६,९०१ | ८४,६९९ | ७३,६८० | ५४,२३७ | ८३,१३८ | ८९,७७१ | ६९,३१३ | १,११,६४२ |
| कापूस (रुई)@ | ७,२०० | ७,६५५ | ८,८३४ | ७,००० | ७,५०० | १०,७५५ | ६,०९४ | ६,५९३ | ६,६३९ | १०,११० |
| फळे | १०,५३८ | ९,७८५ | १३,४५८ | ११,०९० | ९,७५० | १०,६३० | ११,७२९ | १०,७७८ | १२,६२४ | १२,२३० |
| भाजीपाला | ८,७७८ | ८,००८ | १०,१६२ | ८,७८३ | ९,४५२ | १०,५२० | १२,३०७ | ११,४७२ | १३,०४३ | १५,१०६ |

$ खरीप, रब्बी आणि उन्हाळी अंतर्भूत @ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये

टिप : सन २०२०-२१ करिता पीक उत्पादनाची आकडेवारी अंतिम अंदाजांवर आधारीत आहे

- सेंद्रीय शेती उत्पादनात अखिल भारतात मध्यप्रदेश नंतर राज्य (२२ टक्के हिस्सा) दुसऱ्या क्रमांकावर आहे. सन २०२०-२१ मध्ये राज्यातून १.२६ लाख मे.टन सेंद्रीय शेती उत्पादनाची निर्यात झाली
- महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना २०१९ च्या सुरुवातीपासून दि.२२ डिसेंबर, २०२१ पर्यंत ३१.७१ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ २०,२४३ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला
- डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत राज्य शासनाने माहे एप्रिल, २०२१ पासून ₹ तीन लाख रकमेपर्यंतच्या कर्जास व्याजदराचे अनुदान एक टक्क्यावरुन तीन टक्के केले आहे

१.२० मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) प्रकल्पांद्वारे माहे जून, २०२० अखेर ५४.१५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून सन २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ४१.६० लाख हेक्टर (७६.८ टक्के) होते.

१.२१ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे दि.१५ ऑक्टोबर, २०२० रोजी एकूण उपयुक्त जलसाठा ३३,००५ दशलक्ष घनमीटर होता व तो एकूण जलसाठा क्षमतेच्या ७५.२ टक्के होता.

१.२२ सन २०२०-२१ मध्ये ०.६८ लाख हेक्टर क्षेत्र नव्याने सूक्ष्म सिंचनाखाली आले आणि ८४,७२६ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ₹ १५८.२३ कोटी अनुदान जमा करण्यात आले.

१.२३ सन २०२१-२२ मध्ये माहे सप्टेंबर अखेर, वित्तीय संस्थांद्वारे ₹ ३३,०६६ कोटी पीक कर्ज तर ₹ २४,९६३ कोटी कृषि मुदत कर्ज वाटप करण्यात आले.

१.२४ सन २०२१-२२ मध्ये डिसेंबरपर्यंत प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांनी शेतकऱ्यांना एकूण ₹ १४,५३६ कोटी कर्ज वितरित केले.

१.२५ माहे मार्च ते माहे मे, २०२१ कालावधीत अवकाळी पाऊस, गारपिट आणि चक्रीवादळ यामुळे ३१ जिल्ह्यांमधील बाधित झालेल्या सुमारे ०.९१ लाख हेक्टर कृषिक्षेत्राकरीता ₹ १२२.२६ कोटी नुकसान भरपाई मंजूर केली. माहे मे, २०२१ मध्ये तौक्ते चक्रीवादळामुळे १७ जिल्ह्यांमधील बाधित झालेल्या सुमारे ०.१७ लाख हेक्टर कृषिक्षेत्राकरीता ₹ ७२.३५ कोटी नुकसान भरपाई मंजूर केली. माहे जुलै, २०२१ मध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे २४ जिल्ह्यांमध्ये सुमारे ४.४३ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले व त्याकरीता ₹ ३६५.६७ कोटी नुकसान भरपाई मंजूर केली. माहे ऑगस्ट ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीत राज्यातील २८ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी/ पुरामुळे बाधित झालेल्या सुमारे ४८.३८ लाख हेक्टर कृषिक्षेत्राकरीता ₹ ३,७६६.३५ कोटी नुकसान भरपाई मंजूर केली.

१.२६ प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत दि.१७ फेब्रुवारी, २०२२ अखेर राज्यातील १०९.३३ लाख लहान व सीमांतिक लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण ₹ १८,१२०.२३ कोटी रक्कम जमा करण्यात आली.

१.२७ डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये १.२९ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ १६.०५ कोटी रक्कम व्याज सवलत अनुदान वितरीत करण्यात आले तर सन २०१९-२० मध्ये ४.२६ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ ५२.८९ कोटी रक्कम व्याज सवलत अनुदान वितरीत करण्यात आले.

१.२८ पशुगणना २०१९ नुसार सुमारे ३.३१ कोटी पशुधनासह राज्य देशात सातव्या क्रमांकावर आहे. सुमारे ७.४३ कोटी कुक्कुटादी पक्ष्यांच्या संख्येसह राज्य देशात पाचव्या क्रमांकावर आहे.

१.२९ सन २०२०-२१ मध्ये शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे दैनिक सरासरी दूध संकलन अनुक्रमे ०.५० लाख लिटर व ४०.४३ लाख लिटर होते, तर सन २०१९-२० मध्ये ते अनुक्रमे ०.९६ लाख लिटर व ३९.७६ लाख लिटर होते.

१.३० सन २०२०-२१ मध्ये सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन अनुक्रमे ३.९९ लाख मे. टन व १.२५ लाख मे. टन होते, तर सन २०१९-२० मध्ये ते अनुक्रमे ४.४४ लाख मे. टन व १.१८ लाख मे. टन होते.

१.३१ सन २०२०-२१ अखेर राज्याचे वनक्षेत्र भौगोलिक क्षेत्राच्या २०.१ टक्के होते.

१.३२ राज्याने तौक्ते चक्रीवादळामुळे मृत जनावरांसाठी ₹ १०.८८ लाख, पोल्ट्री शेडच्या नुकसानीसाठी ₹ ३.८५ लाख आणि मासेमारी बोटी व जाळ्यांच्या झालेल्या नुकसानीपोटी ₹ ६३०.५३ लाख नुकसान भरपाई मंजूर केली आहे. राज्याने माहे जून, २०२१ मध्ये निसर्ग चक्रीवादळामुळे मृत जनावरांसाठी ₹ १०.१२ लाख भरपाई मंजूर केली आहे. राज्याने माहे जुलै, २०२१ मध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे मृत जनावरांसाठी ₹ ९२५.३४ लाख, पोल्ट्री शेडच्या नुकसानीसाठी ₹ १३.१७ लाख आणि मासेमारी बोटी व जाळ्यांच्या झालेल्या नुकसानीपोटी ₹ १,१०१.२८ लाख नुकसान भरपाई मंजूर केली आहे.

## उद्योग व सहकार

- मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत माहे जून, २०२० ते माहे डिसेंबर, २०२१ मध्ये राज्यात ₹ १.८८ लाख कोटी गुंतवणूक व ३.३४ लाख अपेक्षित रोजगार असलेले प्रस्ताव प्राप्त झाले
- महाराष्ट्र इलेक्ट्रीक व्हेईकल प्रोत्साहन धोरण, २०१८ अंतर्गत पाच इलेक्ट्रीक वाहन उत्पादन घटक आणि एका बॅटरी उत्पादन घटकाकडून ₹ ८,४२० कोटी प्रस्तावित गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यामध्ये ९,५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे
- माहे ऑक्टोबर, २०२१ अखेर राज्यात १०,७८५ स्टार्ट-अप होते
- पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी माहे मार्च, २०२१ मध्ये कॅराव्हॅन धोरण आणि माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये साहसी पर्यटन उपक्रम धोरण राज्याने जाहीर केले
- श्री एकवीरा देवी, कार्ला येथे फ्युनिक्युलर रेल्वे/ रोपवे आणि पुणे जिल्ह्यातील राजगड किल्ला येथे रोपवे उभारण्याकरिता सामंजस्य करार करण्यात आला
- माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये राज्याने वैद्यकीय आणि आरोग्य पर्यटनाला चालना देण्यासाठी बांगलादेश आणि ओमान या देशांसोबत सामंजस्य करार केले

१.३३ माहे ऑगस्ट, १९९१ मध्ये उदारीकरणाचे धोरण अंगिकारल्यापासून माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंत राज्यात ₹ १५,०९,८११ कोटी गुंतवणुकीसह २१,२१६ औद्योगिक प्रकल्प मंजूर करण्यात आले. सन २०२१ मध्ये माहे नोव्हेंबर पर्यंत ₹ ७४,३६८ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या २५८ प्रकल्पांची नोंदणी झाली.

१.३४ माहे एप्रिल, २००० ते माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत राज्यातील थेट परदेशी गुंतवणूक ₹ ९,५९,७४६ कोटी असून ती अखिल भारताच्या एकूण थेट परदेशी गुंतवणुकीच्या २८.२ टक्के होती.

१.३५ माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंत, ६१.८५ लाख रोजगारासह राज्यात एकूण १०.३१ लाख (९.८६ लाख सूक्ष्म, ०.३९ लाख लघु व ०.०६ लाख मध्यम) उपक्रम उद्यम नोंदणी अंतर्गत नोंदणीकृत होते.

१.३६ दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिकेचा एक भाग म्हणून वॉक-टू-वर्क या संकल्पनेवर आधारीत सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून राज्यातील ४,०३९ हेक्टर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) विकास केला जात आहे. माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंत, ऑरिकमध्ये सुमारे ३३७ एकर क्षेत्रावरील १२६ भूखंडांचे गुंतवणूकदारांना वाटप करण्यात आले आहे. ऑरिकमध्ये ₹ ५,५०० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे ५,९०९ रोजगार निर्मिती झाली आहे.

१.३७ 'दृष्टीक्षेपात भारत पर्यटन सांख्यिकी-२०२१' अहवालानुसार सन २०२० मध्ये राज्यात देशांतर्गत पर्यटकांच्या भेटींची संख्या ३.९२ कोटी आणि विदेशी पर्यटकांच्या भेटींची संख्या ०.१३ कोटी होती, तर सन २०१९ मध्ये देशांतर्गत पर्यटकांच्या भेटींची संख्या १४.९३ कोटी आणि विदेशी पर्यटकांच्या भेटींची संख्या ०.५५ कोटी होती.

१.३८ राज्यात दि. ३१ मार्च, २०२१ रोजी सुमारे ५.७५ कोटी सभासद असलेल्या २.१७ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी ९.६ टक्के प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था, ९.७ टक्के बिगर-कृषि पतपुरवठा संस्था, ५३.० टक्के गृहनिर्माण संस्था, १२.२ टक्के कृषि प्रक्रिया संस्था, ५.० टक्के मजूर कंत्राटी संस्था आणि १०.५ टक्के इतर कार्यात गुंतलेल्या संस्था होत्या.

## पायाभूत सुविधा

१.३९ सन २०२०-२१ मध्ये राज्यात एकूण १,५१,६७१ दशलक्ष युनिट (केंद्रीय क्षेत्राकडून प्राप्त विजेसह) वीज निर्मिती झाली असून राज्यातील एकूण विजेचा वापर १,२४,६९१ दशलक्ष युनिट होता.

- दि.३१ मार्च, २०२१ रोजी राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता आणि सन २०२०-२१ मध्ये राज्यातील वीज निर्मिती देशात सर्वाधिक होती
- राज्यासाठी विजेचा दरडोई अंतिम वापर १,००५.९ युनिट असून अखिल भारतासाठी तो ७६८.५ युनिट आहे

१.४० सन २०२१-२२ मध्ये माहे नोव्हेंबरपर्यंत, विजेची सरासरी कमाल मागणी १८,८४१ मेगावॅट होती तर पुरवठा २०,२०६ मेगावॅट होता. सन २०२०-२१ मध्ये विजेची सरासरी कमाल मागणी १९,२५० मेगावॅट होती तर पुरवठा २१,८८१ मेगावॅट होता.

१.४१ सन २०२०-२१ मध्ये महापारेषणची पारेषण हानी २.९३ टक्के तर महावितरणची वितरण हानी आणि 'एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक' हानी अनुक्रमे १५.२९ टक्के व २०.७३ टक्के होती.

- अंदाजित किंमत ₹ १७,८४३ कोटी असलेला मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प प्रगतीपथावर आहे
- मुंबई किनारा रस्ता प्रकल्प (दक्षिण) (अंदाजित किंमत ₹ १२,७२१ कोटी) प्रगतीपथावर असून माहे सप्टेंबर, २०२१ अखेर सुमारे ४० टक्के काम पूर्ण झाले

१.४२ माहे मार्च, २०२१ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी सुमारे ३.२१ लाख किमी होती.

१.४३ हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा मुंबई व नागपूर शहरांना जोडणारा एकूण ₹ ५५,३३५.३२ कोटी अपेक्षित खर्च असलेला आठ पदरी (७०१ किमी लांब व १२० मीटर रुंद) द्रुतगती महामार्ग प्रस्तावित आहे. माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत या महामार्गाचे सुमारे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून ₹ ३९,१४५ कोटी खर्च झाला.

- मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा २ अंतर्गत ठाणे-दिवा रेल्वे मार्गाच्या अतिरिक्त पाचवी व सहावी मार्गिका कार्यान्वित झाल्या
- मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाअंतर्गत दहिसर ते डी. एन. नगर (मेट्रो लाईन २A) आणि अंधेरी (पू.) ते दहिसर (पू.) (मेट्रो लाईन ७) चे काम अंतिम टप्प्यात आहे
- कुलाबा-वांद्रे-सीप्झ (मेट्रो लाईन ३) अंदाजित किंमत ₹ ३३,४०६ कोटी, वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली (मेट्रो लाईन ४) अंदाजित किंमत ₹ १४,५४९ कोटी, कासारवडवली-गायमुख (मेट्रो लाईन ४A) अंदाजित किंमत ₹ ९४९ कोटी, ठाणे-भिवंडी-कल्याण (मेट्रो लाईन ५) अंदाजित किंमत ₹ ८,४१७ कोटी, स्वामी समर्थ नगर-विक्रोळी (मेट्रो लाईन ६) अंदाजित किंमत ₹ ६,७१६ कोटी, दहिसर (पू.)-मिरा भाईंदर आणि अंधेरी (मेट्रो लाईन ९) अंदाजित किंमत ₹ ६,६०७ कोटी असलेली कामे प्रगतीपथावर
- नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प यांचे काम प्रगतीपथावर आहे
- नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून या प्रकल्पामधील खापरी ते कस्तुरचंद पार्क (उत्तर- दक्षिण मार्ग) आणि लोकमान्य नगर ते सीताबर्डी ( पूर्व-पश्चिम मार्ग) जनतेसाठी खुले झाले
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (अंदाजित किंमत ₹ १४,१७९ कोटी) विकसनाचे काम सुरू

१.४४ राज्यातील रस्त्यावरील वाहनांची संख्या दि. १ जानेवारी, २०२२ रोजी ४०९ लाख (१२८ वाहने प्रति किमी रस्ता लांबी) होती, तर दि. १ जानेवारी, २०२१ रोजी ३८६ लाख (१२५ वाहने प्रति किमी रस्ता लांबी) होती.

१.४५ सन २०२१-२२ मध्ये माहे सप्टेंबरपर्यंत, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या प्रति दिन सरासरी १७,१७९ बस गाड्यांनी २५.२७ लाख किमी प्रवास करून १५.०३ लाख प्रवासी वाहतूक केली.

१.४६ सन २०२०-२१ मध्ये, मोठ्या व लहान बंदरांमधून झालेली एकत्रित मालवाहतूक १,४३६.५९ लाख मे. टन होती तर ती मागील वर्षी १,७२८.०५ लाख मे. टन होती.

१.४७ सन २०२०-२१ मध्ये देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून झालेली प्रवासी वाहतूक अनुक्रमे १३३.९६ लाख व १२.२३ लाख होती तर सन २०१९-२० मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ४५८.४९ लाख व १२५.२१ लाख होती.

१.४८ सन २०२०-२१ मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे १.८७ लाख मे. टन व ४.४१ लाख मे. टन होती तर सन २०१९-२० मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ३.३० लाख मे. टन व ५.८३ लाख मे. टन होती.

१.४९ राज्यात माहे सप्टेंबर, २०२१ अखेर इंटरनेट ग्राहकांची संख्या १०.२२ कोटी आहे. माहे डिसेंबर, २०२१ अखेर भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या १२.६६ कोटी आहे.

## सामाजिक क्षेत्र

- सन २०१९ मध्ये जन्मदर, मृत्यूदर व अर्भक मृत्यूदर हे अनुक्रमे १५.३, ५.४ व १७ होते
- सन २०१८ मध्ये पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर, नवजात शिशु मृत्यूदर व एकूण जननदर हे अनुक्रमे २२, १३ व १.७ होते
- सन २०१६-१८ मध्ये माता मृत्यूप्रमाण ४६ होते

१.५० दि.३० सप्टेंबर, २०२० रोजी एकूण १,०६,३३८ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळा होत्या व त्यातील पटसंख्या १५३.९ लाख होती तर २८,५०५ माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) शाळा होत्या व त्यातील पटसंख्या ६५.२ लाख होती.

१.५१ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी २०१९-२० अहवालानुसार राज्यात ६५ विद्यापीठे, ४,४९४ महाविद्यालये आणि २,३९३ स्वायत्त संस्था होत्या व त्यातील पटसंख्या ५२.३१ लाख होती.

१.५२ एकात्मिक महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये माहे जानेवारी पर्यंत, सुमारे ७.१६ लाख शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले असून त्यावर ₹ १,३६०.६१ कोटी खर्च झाला.

१.५३ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये माहे ऑगस्टपर्यंत एकूण ३७,११२ स्वयंसहाय्य गटांना ₹ ६३८.५२ कोटी पतपुरवठा करण्यात आला.

१.५४ कोविड-१९ महामारीच्या सुरूवातीपासून दि. १५ जानेवारी, २०२२ पर्यंतची राज्यातील रूग्णांची माहिती खालीलप्रमाणे होती.

- बाधित रूग्णांची संख्या ७१.७० लाख तर त्यापैकी बरे झालेल्या रूग्णांची संख्या ६७.६० लाख होती
- रूग्ण बरे होण्याचा दर ९४.३ टक्के होता
- एकूण मृत्यू १.४२ लाख होते
- रूग्ण मृत्यूदर २.० टक्के होता

१.५५ राज्यात दि.१७ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत १८ वर्षे व त्यावरील वयाच्या एकूण ६.४८ कोटी व्यक्तींचे, १५ ते १८ वर्षे वयोगटातील ०.४५ कोटी मुलांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे आणि ०.१४ कोटी व्यक्तींना प्रिकॉशन डोस देण्यात आला आहे.

- दि.३० सप्टेंबर, २०२० रोजी मुली-मुले असमानता निर्देशक प्राथमिककरिता ०.८९, उच्च प्राथमिककरिता ०.८८, माध्यमिककरिता ०.८६ व उच्च माध्यमिककरिता ०.८७ आहे
- एकात्मिक बाल विकास सेवा कार्यक्रमाअंतर्गत कोविड-१९ महामारीमुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांच्या नावे ₹ पाच लाख मुदत ठेवीच्या स्वरुपात अर्थसहाय्य देण्यात आले. सन २०२१-२२ मध्ये माहे नोव्हेंबरपर्यंत ३९७ लाभार्थी बालके होती

१.५६ सन २०२०-२१ मध्ये, ० ते ५ वयोगटातील ९०.० टक्के बालके सर्वसाधारण वजनाची, ८.६ टक्के बालके मध्यम कमी वजनाची आणि १.४ टक्के बालके तीव्र कमी वजनाची होती. सन २०१९-२० मध्ये, तत्सम आकडेवारी अनुक्रमे ८८.२ टक्के, ९.९ टक्के आणि १.९ टक्के होती.

१.५७ सन २०२०-२१ मध्ये, आदिवासी क्षेत्रात ० ते ५ वयोगटातील ८०.२ टक्के बालके सर्वसाधारण वजनाची, १६.० टक्के बालके मध्यम कमी वजनाची आणि ३.८ टक्के बालके तीव्र कमी वजनाची होती. सन २०१९-२० मध्ये, तत्सम आकडेवारी अनुक्रमे ७९.० टक्के, १६.८ टक्के आणि ४.२ टक्के होती.

१.५८ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंत १७१ शहरांना ओडीएफ+, २१२ शहरांना ओडीएफ++ आणि एका शहरास वॉटर+ म्हणून घोषित करण्यात आले.

* * * * *